# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणेशहर

## P.R.O. OFFICE, DCP ZONE-4, THANE CITY

Address- Office of Dy. Commissioner of Police, Zone-4,
Near Central Police Station , Behind Central Hospital,Ulhasnagar- 3
Email Id- cp.thane.pro@mahapolice.gov.in Contact No: +919819028279

THANE POLICE COMMISSIONERATE

प्रेस नोट क्रमांक – दिनांक–२१/०३/२०२४

**॥ सराईत गुन्हेगार इसम नामे इरफान गुलाब शेख यांच्यावर एमपीडीए कायदयार्गत केले स्थानबध्द ॥**

अंबरनाथ पोलीस स्टेशन रेकॉर्डवरील हिस्ट्रीशिटर इरफान गुलाब शेख, वय–२८ वर्षे, राह–वांद्रापाडा, अंबरनाथ पं. हा सराईत गुन्हेगार असुन त्याच्या गुन्हेगारी कारवायामुळे अंबरानाथ शहरात दहशत पसरली होती. तो दहशत माजवुन, आपले गुंड प्रवृत्तीने अंबरनाथ मध्ये लोकांना दमदाटी करत होता. त्यांचेविरूध्द खुनाचा प्रयत्न, चोरी, घरफोडी, गर्दी करणे, दुखापत, बेकायदेशिर शस्त्र बाळगणे, जबरी चोरी करणे अशा प्रकारचे २९ गुन्हे दाखल आहेत. अशा प्रकारचे गुन्हे करण्याची त्यास सवय जडलेली होती. त्याचे विरूध्द कोणीही सर्वसामान्य नागरीक तक्रार देण्यास धजावत नव्हता. मागील तीन/चार वर्षात त्याच्या गुन्हेगारी कारवाया मोठया प्रमाणात वाढलेल्या होत्या. तो जामीनावर सुटताच पुन्हा पुन्हा गंभीर स्वरुपाचे गुन्हे करत होता.

आगामी लोकसभा निवडणुक – २०२४ निर्भिड व शांततापुर्वक पार पाडण्यासाठी सदर इसमावर ठोस प्रतिबंधक कारवाई करणे आवश्यक होते . त्याकरीता सदर इसमास स्थानबध्द करण्याचा प्रस्ताव वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगन्नाथ कळसकर यांनी तयार करुन तो श्री.सुरेश वराडे, सहा पोलीस आयुक्त, अंबरनाथ विभाग, डॉ. सुधाकर पठारे, पोलीस उप आयुक्त, परि–४, उल्हासनगर, श्री.दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण यांच्या मार्फतीने मा.पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांना सादर करण्यात आला होता.

दि.१९/०३/२०२४ रोजी श्री. आशुतोष डुंबरे,पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांनी सदर प्रस्तावास मंजुरी देवुन नियोजित स्थानबंध्द इसम नामे इरफान गुलाब शेख, वय–२८ वर्षे, राह–वांद्रापाडा, अंबरनाथ प. यास महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधीद्रव्ये विषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती व दृकश्राव्य कलाकृतीचे विना परवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ पायरेट्स) यांच्या विघातक कृत्यांना आळा घालणे बाबतचा अधिनियम सन १९८१ व सुधारीत अधिनियम सन १९९६चे कलम ३(१) (**MPDA**),मधील तरतुदी नुसार''धोकादायक व्यक्ती''म्हणुन १ वर्षाकरीता स्थानबध्द करण्याचे आदेश निर्गमित केले. सदरचे आदेश प्राप्त होताच. नियोजित स्थानबध्द इसम यास दि. २०/०३/२०२४ रोजी अंबरनाथ पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रगटीकरण पथकाचे सहा पो.निरी/ संदिप भालेराव, पो.हवा/२६१८ विशे, पो.हवा/३८६४ जाधव, पो.शि/८०४० निरगुडा यांनी शिताफीने ताब्यात घेवुन कायदेशीर प्रक्रिया पुर्ण करुन त्यास आज.दि.२१/०३/२०२४ रोजी येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे १ वर्ष कालावधीसाठी स्थानबध्द करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्री.आशुतोष डुंबरे, पोलीस आयुकत, ठाणे शहर यांच्या आदेशान्वये श्री. ज्ञानेश्वर चव्हाण, पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर, श्री.दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण, डॉ.सुधाकर पठारे, पोलीस उप आयुक्त, परि–४,उल्हासनगर , श्री.सुरेश वराडे, सहा पोलीस आयुक्त, अंबरनाथ विभाग, श्री.अमोल कोळी, सहा पोलीस आयुक्त, उल्हासनगर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली जगन्नाथ कळसकर वरिष्ठ पोलीस निरीक्षक,अंबरनाथ पोलीस स्टेशन, सहा पो.निरी/ संदिप भालेराव, पो.हवा/२६१८ विशे व गुन्हे प्रगटीकरण पथकाचे अंमलदार यांनी उत्कृष्ट अशी कामगिरी केली आहे.